# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/12/2022 (शुक्रवार) सायंकाळ

---

### पोलीस स्टेशन रामटेक येथील घरफोडीचा गुन्हा उघड करून गुन्हयातील चोरीस गेलेला सोन्या चांदीच्या दागिन्यासह एकूण 99,645 रुपयाचा मुद्देमाल हस्तगत

### स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई

दिनांक 25/12/2022 चे 08.00 वा. ते 17.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुनिल मोतीराम पानतावने, वय 40 वर्ष, रा. महेष नगर छोरिया ले आऊट रामटेक हे घराला कुलुप लावुन टाकळघाट येथे दर्शनासाठी गेले असता दर्शन करून परत आले कोणीतरी अज्ञात चोराने घराचे आत प्रवेश करून लाकडी आलमारी मधुन सोन्या चांदीचे दागिने कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याचे फिर्यादीचे रीपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे अप. क्र. 774/22 कलम 457, 380 भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने सुरू केला. दिनांक 29/12/2022 रोजी गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, सदर गुन्हयात फिर्यादी नामे– सुनिल मोतीराम पानतावने, वय 40 वर्ष, रा. महेष नगर छोरिया ले आऊट रामटेक यांचा एक नातेवाईक मुलगा (विधीसंघर्ष बालक) याचा सहभाग असण्याची खात्रीषीर माहिती मिळाली. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने विधीसंघर्ष बालक यास विचारपूस करण्यासाठी त्याच्या राहत्या घरी जावून त्यास सदर गुन्हयाच्या अनुषंगाने (विधीसंघर्ष बालक) यास विचारपूस केली असता त्याने सांगितले की, अंदाजे आठ ते दहा महिने अगोदर तो त्याचे नातेवाईक नामे सुनिल पानतावणे यांचेकडे रामटेक येथे राहात होता त्यादरम्यान सुनिल पानतावणे यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे दोन चाबी असुन एक चाबी सनिल पानतावणे व एक चाबी त्यांची पत्नी जवळ असल्याचे त्यास माहित होते. त्याचे नातेवाईक सुनिल पानतावणे हे घराला लॉक लावुन परिवारासह बाहेर जात असतांना सुद्धा त्यांचे घरातील आलमारी नेहमी उघडी राहत असुन व ड्रॉवर मध्ये पैसे व दागिने नेहमी राहत असलेबाबत त्यास माहिती होते. त्यानुसार सुनिल पानतावणे यांच्या घरात चोरी करण्याची योजना त्याने खुप अगोदरच आखुन ठेवलेली होती. सात ते आठ महिने अगोदर वेळ मिळताच त्याने घरातील चाबीचे सेट मधुन घराचे मुख्य दरवाजाची चाबी चोरून जवळ ठेवली होती. काही महिने अगोदर पासुन तो सुनिल पानतावणे यांचे कडे न राहता त्याचे आई वडीलांसह मुळ गावी राहु लागला. दिनांक 25/12/2022 रोजी यातील फिर्यादी हे बाहेर गावी गेल्याचे माहिती झाल्याने त्याने चोरी करण्याची योजना आखुन दिवसा फिर्यादी यांच्या घरी जावून चोरी केल्याचे सांगितले. त्यावरून त्याचे कडून नमूद गुन्ह्यातील चोरीस गेलेला मुद्देमाल पैकी सदर विधीसंघर्ष बालक याचे ताब्यातून 1) एक सोन्याची चौन लॉकेट वजनी 7.700 मि.ली. किंमती 40,425/–रू. 2) एक सोन्याची लेडीज अंगठी वजनी 2.500 मि.ली. किंमती 13,125 रू. 3) सुईधागा लटकन कानातले एक नग वजनी 0.900 मि.ली. किंमती 4.725/–रू. 4) एक सोन्याचा वितळवलेला गडा (रवा) वजनी 12.900 मि.ली. किंमती 40250/–रू. 5) एक जोड चांदीच्या पायपट्टया वजनी 14.500 मि.ली. किमती 940/–रू. 6) फिर्यादीच्या राहत्या घराच्या मुख्य दरवाजाची गुन्हा करतेवेळी चाबी ज्यावर इंग्रजीत एका एका बाजुस 2777 नंबर व दुसऱ्या बाजुस इंग्रजीत Yark लिहीलेली चाबी किंमती 00.00 रू. असा एकुण किमती 99,645/– रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक श्री. राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी रोषन काळे, नापोषि रोहन डाखोरे, विपीन गायधने, चालक पोहवा अमोल कुथे तसेच पोना सतिष राठोड सायबर सेल यांनी पार पाडली.



## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. काटोल** :– दिनांक २९/०६/२०१९ चे २२.०४ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अप. क्र. ४४३/२०१९ कलम ३५४, ३५४ (अ) (१)(आय), ५०४ भादवि. सहकलम ७, ८ पोक्सो. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २८/०६/२०१९ चे १०.०० वा. ते १०.३० वा. सुमारास यातील अल्पवयीन पिडीत मुलगी हि आपल्या मोठया बहिणी सोबत वंडली खुर्द येथे सुभाष भाऊ यांच्या शेतामध्ये सरकिचे कामाकरीता ईश्वर सावरकर यांच्या जीप गाडीमध्ये मोठया बहिणी सोबत बसुन जात असतांना यातील आरोपीने अल्पवयीन पिडीत मुलीच्या डाव्या मांडीला हात लावुन मला तुझ्याशी बोलायचे आहे. असे म्हटले असता पिडीतेने आरोपीचे हात झटकला असता आरोपीने पिडीतेला स्पर्श करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक श्री. आकाश शाही पो.स्टे. काटोल यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक ३०/१२/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी. जे. त्रिवेदी न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस ७, ८ पोक्सो मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व २०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०१ महिना सश्रम कारावास तसेच कलम ३५४, ३५४(अ) भादवि मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व २०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०१ महिना सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी सोनाली राऊत मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस शिपाई ब. नं. ४०५ प्रमोद कोहळे पोस्टे काटोल यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**